दिनांक 28/08/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 44

विषय – विटा नगरपरिषदेसाठी स्टील कंपनीची झाडे कटींग करणेकामी कटर मशीन, लॉन कटर मशीन खरेदी करणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 27/08/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेसाठी स्टील कंपनीची झाडे कटींग करणेकामी कटर मशीन, लॉन कटर मशीन खरेदी करणेकामी खालील निविदा दाखल आहेत.

| | कटर मशीन प्रति नग | लॉन कटर मशीन प्रति नग |
|---|---|---|
| 1) ओंकार ट्रेडर्स, विटा | र.रू.35,100/- | र.रू.85,830/- |
| 2) नवभारत ॲटो सेंटर, कोल्हापूर | र.रू.32,900/- | र.रू.84,180/- |
| 3) नवभारत इक्विपमेंट, सातारा | र.रू.34,500/- | र.रू.85,600/- |

उपरोक्त निविदापैकी नवभारत ॲटो सेंटर, कोल्हापूर यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 28/08/ 2024 रोजी चा प्रशासकीय ठराव क्र.45

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील सि.स.नं.273 मधील प्राथमिक आरोग्य केंद्राची जागा उप जिल्हा रुग्णालय बांधणे कामी मा.जिल्हा शल्य चिकित्सक सांगली यांचे कार्यालयाकडे वर्ग करणे बाबत.

संदर्भ -
1. मा.जिल्हा शल्य चिकित्सक सांगली यांचे कडील जा.क्र. सरुसा/247477/24, दिनांक 22/05/2024 रोजीचे पत्र
2. मा.कौन्सील सभा ठराव क्रमांक 200, विषय क्रमांक 7 दिनांक 27/08/1992
3. श्री.जयसिंग काशिराम शितोळे यांचा दिनांक 27/12/2010 रोजीचा अर्ज
4. मा.कौन्सील सभा ठराव क्रमांक 58, विषय क्रमांक 2 दिनांक 20/03/2013
5. मा.कौन्सील सभा ठराव क्रमांक 85, विषय क्रमांक 16 दिनांक 16/07/2013
6. या कार्यालया कडील जा.क्र. 1889 दिनांक 13/08/2013 रोजीचा प्रस्ताव
7. मा. सर्व साधारण सभा ठराव नं 10 विषय नं 10 दिनांक 28/07/2020 दिनांक 08/07/2024 ने मुख्याधिकारी यांचे कडील मंजूर टिप्पणी.

मा.जिल्हा शल्य चिकित्सक सांगली यांनी विटा येथे 100 खाटा चे उप जिल्हा रुग्णालय शासना कडून मंजूर झाले असून सदर उप जिल्हा रुग्णालय बांधकाम हे विटा नगरपरिषद हद्दीतील सि.स.नं.273 मधील प्राथमिक आरोग्य केंद्र , कराड रोड, विटा येथील जागेत करणे बाबत संदर्भीय पत्राने कळवले आहे.

सि.स.नं. 273 चे मालमत्ता पत्रक पाहिले असता त्यावर मालक सदरी अध्यक्ष विटा नगरपरिषद विटा प्राथमिक आरोग्य केंद्र अशी नोंद आहे. सदर जागा श्री जयसिंग काशिराम शितोळे व इतर 2 यांनी सार्वजनिक दवाखाना बांधणे साठी सदर जागा बक्षीस पत्राने अध्यक्ष, विटा नगरपरिषद यांचे नावे हस्तांतरित केली आहे. त्यानंतर पंचायत समिती आरोग्य विभागा मार्फत सदर प्राथमिक आरोग्य केंद्र चालवणेत येत होते. विटा शहरात सांगली रोड येथे ग्रामीण रुग्णालय सुरु झाले नंतर प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतरित करणे कामी कार्यवाही सुरु झाले नंतर संदर्भ क्रमांक २, मा.कौन्सील सभा ठराव क्रमांक 200, विषय क्रमांक 7 दिनांक 27/08/1992 ने त्या ठिकाणी डीस्पेनसरी सुरु करणे साठी ठरावा ने मान्यता दिली होती. त्या नंतर संदर्भ क्रमांक 4 मा. कौन्सील सभा ठराव क्रमांक 85, विषय क्रमांक 16 दिनांक 16/07/2013 ने प्राथमिक आरोग्य केंद्र ग्रामीण रुग्णालयात विलीन करून या ठिकाणी (सि.स.नं273) ग्रामीण रुग्णालयाचे उप केंद सुरु करणेत यावे व ते शक्य नसलेस सदर ठिकाणी विटा नगरपरिषदे मार्फत दवाखाना सुरु करणेसाठी परवानगी मिळणेसाठी चा प्रस्ताव शासनास पाठवणेस मान्यता दिली होती. त्यानुसार संदर्भ क्रमांक 5, जा.क्र. 1889 दिनांक

13/08/2013 ने या कार्यालया मार्फत या जागेत ग्रामीण रुग्णालया चे उपकेंद सुरु करणे साठी मा.जिल्हा नियोजन समिती कडे प्रस्ताव दाखल केला होता.

संदर्भ क्रमांक 6,मा. सर्व साधारण सभा ठराव नं10 विषय नं 10 दिनांक 28/07/2020 ने प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतरित होताच सदर जागा नगरपरिषदेच्या ताब्यात घेणेस मंजुरी दिली होती.परंतु सदर जागा बक्षीस पत्राने विनामोबदला जागा हस्तांतरित केलेले श्री जयसिंग काशिराम शितोळे व इतर 2 पैकी श्री जयसिंग काशिराम शितोळे यांनी सदर जागा वापर सार्वजनिक दवाखाना खेरीज इतर कारणासाठी करू नये असे संदर्भ क्रमांक 3 चे पत्राने कळवले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करून सदर जागा मा.जिल्हा शल्य चिकित्सक सांगली यांचे कडे वर्ग करायची झालेस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती, औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 92(1) अन्वये महाराष्ट्र शासन यांचे कडील मंजुरी आवश्यक आहे.

तरी वरील मुद्द्यांचा विचार करून महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती, औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 92(2) अन्वये सदरचा प्रस्ताव मा. शासणाकडे सादर करणेस मंजुरी देत आहे. या कामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा